**Publication: Prabhat**

**Headline: RSBL Starts gold contract in Pune**

**Edition: All Editions**

**Date: 14th April, 2011**

**Coverage –**



# रिद्धीसिद्धीद्वारा पुण्यातील ग्राहकांसाठी गोल्ड कॉन्ट्रॅक्ट

पुणे, दि. १३ - मुंबईस्थित रिद्धीसिद्धी बुलियन (आरएसबीएल) द्वारा पुण्यातील स्पॉट ग्राहकांसाठी गोल्ड पीयूएन ९९९ हे सोन्याचे नवीन कॉन्ट्रॅक्ट उपलब्ध केले आहे. मात्र, हे कॉन्ट्रॅक्ट केवळ टी+२अशा व्यवहारापुरते मर्यादित असेल. म्हणजे व्यवहाराच्या दोन दिवसांच्या आत डिलिव्हरी बंधनकारक असणार आहे.

आरएसबीएलने पुण्यातील दागिने उत्पादकांसाठी मे २००९ पासून स्पॉट (स्पॉट प्रेसियस ऑनलाइन ट्रेडिंग) सुरू केले आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञान आधारित सेवेचे पुण्यातील व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात स्वागत केले आहे.

याबाबत बोलताना आरएसबीएलचे संचालक मुकेश कोठारी म्हणाले की, सोन्याच्या वाढत्या किमतीचा पुणेकरांच्या सोने खरेदीवर परिणाम झालेला नाही.

या काळात पुणेकरांची सोने खरेदी १५ ते २० टक्क्यांनी वाढली आहे. हे सोने दागिन्यांसाठीच्या आणि गुंतवणुकीसाठी बारच्या स्वरूपातील आहे. त्यामुळे आम्ही पुण्यातील स्पॉट ग्राहकांसाठी नवे कॉन्ट्रॅक्ट उपलब्ध केल्याचे कोठारी यांनी सांगितले.

नव्या तंत्रज्ञानामुळे दागिने उत्पादकांचा थेट बुलियन मार्केटशी संबंध येण्यास मदत होऊ लागली आहे.

आता पुण्यासह बऱ्याच महत्त्वाच्या शहरातील दागिने उत्पादक स्थानिक आणि जागतिक किमतीकडे लक्ष ठेवून व्यवहार करू शकतात, असे कोठारी म्हणाले.